**आर.सी.सी.नं.६०७/२०१३**
**सरकार विरुध्द प्रदीप कवडाळे व इतर**

आदेश निशाणी क्र.५०

अभियोगपक्षाने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ९१ अन्वये एम.आय.डी.सी.भोसरी पोलीस स्टेशनचे विरोधात त्यांनी दोन इ तिकीट मशिन दाखल केले नाहीत, त्यामुळे सर्च वॉरंट काढावेत म्हणून दाखल केला आहे.

२. अभियोगपक्षाने सदरच्या अर्जात असे नमुद केले आहे की, प्रकरणातील गुन्हा रजिस्टर नं.५०/२०१३ मध्ये संबंधित तपास अधिकारी यांनी आरोपीचे नैसर्गिक व नमुना हस्ताक्षराचे नमुने व बनावट तिकीट दर्शक तक्ता हे हस्ताक्षर परिक्षण करुन अहवाल मिळणेकामी दिनांक ०९/०७/२०१३ रोजी मा.मुख्य दस्त्ऐवज परिक्षक, स.गुन्हे अन्वेषण विभाग पुणे यांना पाठविलेले होते. तपासा दरम्यान तपास अधिकारी यांनी जप्त केलेल्या ई तिकीट मशिन या प्रोजेक्ट मॅनेजर मे. वंश इन्फोटेक प्रा. लि. यांचेकडे तपासणी होउन अहवाल मिळणेकामी पाठविले होते. त्यानंतर सदर मशिनबाबत फक्त डेटा रिपोर्ट न्यायालयात सादर केला, परंतु दोन ई तिकीट मशिन मात्र अद्याप न्यायालयात सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे दिनांक १४/०६/२०२४ रोजी न्यायालयाने वरिष्ट पोलीस निरीक्षक एम.आय.डी.सी.भोसरी पोलीस स्टेशन यांना त्या मशिन न्यायालयात दाखल करणेबाबत आदेशित केले होते. परंतु तरी देखील तपास अधिकारी यांनी त्याच्या त्या आदेशाचे पालन केले नसुन त्यांचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ९३ अन्वये सर्च वॉरंट काढण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. आरोपी क्र.१ व २ यांनी निशाणी ५२ खाली त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्याप्रमाणे सदरचा अर्ज अभियोगपक्षाने केवळ प्रकरण प्रलंबित ठेवणेकामी दाखल केला असुन अभियोगपक्षास मे. न्यायालयाने पुरेपूर संधी दिल्यानंतर शेवटची संधी म्हणून दिनांक १४/०६/२०२४ रोजी शेवटची संधी असा आदेश पारीत केला होता. त्यानंतर दिनांक २०/०८/२०२४ रोजी फिर्यादीची साक्ष नोंदविण्यात आली. दिनांक ११/१०/२०२४ रोजी पुन्हा फिर्यादीचा उलटतपास घेण्यात आला. त्यानंतर प्रकरणात

निशाणी २९ वर साक्षीदार क्र.३, निशाणी ३३ वर साक्षीदार क्र.४ व निशाणी ३६ वर साक्षीदार क्र.५, निशाणी ४० साक्षीदार क्र.६ म्हणून तपास अधिकारी यांना तपासण्यात आले. त्यामुळे प्रकरणात अभियोगपक्षास वेळोवेळी त्यांचा पुरावा देणेबाबत त्यांना संधी दिलेली असुन सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. प्रस्तुतचा अर्ज व प्रकरणातील सर्व दस्तऐवज यांचे अवलोकन केले. अभियोगपक्ष व आरोपीचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. सदरचे प्रकरण आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुध्द भा.दं.वि.कलम ४२०,४०६,४६८,४७१ सह ३४ अन्वये दाखल केल्याचे दिसुन येते. सदरचे प्रकरणामध्ये दिनांक २५/०७/२०१३ रोजी दोषारोपपत्र दाखल केल्याचे दिसुन येते. तसेच दोषारोपपत्रासोबत मालमत्तेचे वर्णनमध्ये ई तिकीट मशिन नंबर एस.एल.९१८५३६०८ व ई तिकीट मशिन नं.एस.एल.९१८५३६७३ व दोन कंडक्टरकडील तिकीट खप तक्ते असे दिसुन येत आहे. आरोपीं विरुध्द दिनांक २१/११/२०१६ रोजी चार्ज केल्याचे दिसुन येते. त्यानंतर अभियोगपक्षाने प्रकरणातील जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करणेसंबंधी कोणतीही स्टेप्स घेतल्याचे दिसुन येत नाही. तसेच तपास अधिकारी यांचे देखील दोषारोपपत्र दाखल करतेवेळी किंवा त्यानंतर त्यामध्ये असलेल्या मुद्देमाल न्यायालयात हजर करणे ही जबाबदारी आहे. परंतु तपास अधिकारी यांनी देखील प्रकरणामध्ये त्या संदर्भात कोणताही पत्र व्यवहार मुद्देमाल जमा करुन घेणेकामी केल्याचे दिसुन येत नाही.

५. प्रकरणामध्ये निशाणी १ वर माझे पूर्वाधिकारी यांनी दिनांक १४/०६/२०२४ रोजी निशाणी २३ च्या आधारे मुद्देमाल न्यायालयात हजर करणे संदर्भात एम.आय.डी.सी.भोसरी पोलीस स्टेशनला कडक पणे आदेशित केले होते. तसेच त्याचवेळी ती शेवटची संधी असलयाचे देखील आदेशामध्ये नमुद केल्याचे दिसुन येते. परंतु त्यानंतर देखील एम.आय.डी.सी.भोसरी पोलीस स्टेशन यांनी न्यायालयात मुद्देमाल हजर करणेसंबंधी कोणत्याही स्टेप्स व पत्र व्यवहार केला नाही. प्रकरणातील फिर्यादी श्री. शिवाजी सोनु मडके यांना अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ म्हणून दिनांक २०/०८/२०२४ रोजी दिनांक ११/१०/२०२४ व २२/११/२०२४ रोजी निशाणी २३ प्रमाणे तपासल्याचे दिसुन येते. त्या दरम्यान देखील अभियोगपक्षाने प्रकरणातील मुद्देमाल न्यायालयात हजर ठेवणे संदर्भात कोणतेही स्टेप्स घेतल्याचे दिसुन येत नाही.

प्रकरणात तपास अधिकारी यांची देखील साक्ष झालेली आहे.

६. प्रकरणातील सर्व साक्षीदार झालेनंतर अभियोगपक्षाने प्रस्तुतचा अर्ज मुद्देमाल हजर करणे संदर्भात पोलीस स्टेशनला सर्च वॉरंट काढावे म्हणून दाखल केला आहे. प्रकरणातील साक्षी पुरावे झाल्यानंतर अभियोगपक्ष प्रस्तुत अर्जामार्फत पुन्हा एकदा प्रकरणात साक्षी पुरावे घेउ पाहत आहेत. अभियोग पक्षाला व एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशनला प्रकरणातील जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करणेसंबंधी यथायोग्य संधी दिलेली असुन याक्षणी सदर अर्जातुन परत एकदा प्रकरण चालविणे कामी सदरचा अर्ज मंजुर करणेस पात्र दिसुन येत नाही. सबब, वरील सर्व चर्चेअंती व प्रकरणातील साक्षीपुरावे झालेले आहेत, ही बाब पाहता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

<u>आदेश</u>

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2025.10.06 12:09:13 +0530
सत्यमेव जयते

पिंपरी पुणे
दिनांक – ०४/१०/२०२५

(एस.एस. चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपरी, पुणे